20ee

REFBK-0015554

REFBK-0015554


પુષ્પગંધા
યશવંત પારસ્વી

# पुष्पगंधा

काव्यसंग्रह

यशवंत पारखी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५५४
ग्रंथ ... (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
नवक्रम 68990 दि: 2104
क्रमांक 2069 नों. दि: 3013169

REFBK-0015554
REFBK-0015554

प्रकाशिका :-सौ. विजया पारखी
श्रीगणेश साहित्यधारा, नागपूर.

सर्व हक्क प्रकाशिकेचे स्वाधीन

मुद्रक :-अनंत हिवसे अशोक प्रिंटिंग प्रेस, महाल, नागपूर.

मुखपृष्ठ व काव्यचित्रे :-श्री. या. रा. देवसन्त, D. Art.

ब्लॉक्स :-श्री. मधुकर खेळकर,
ग्राफार्ट, ३ फार्मलँड, रामदासपेठ, नागपूर.

मुखपृष्ठ छपाई :-शक्ति ऑफसेट, नागपूर.

मूल्य २ रु. ५० न. पैसे फक्त

पत्रव्यवहार :—सौ. विजया पारखी
"श्रीगणेश साहित्यधारा"

दूरध्वनि २६२९१
श्री. चाटे वाडा स. नं. ४, चिटणविसपुरा-मार्ग,
महाल, नागपूर - २.



# अर्पितो मी......

तीर्थरूप **कै. गणपतराव पारखी** व गुरुवर्य **श्री. त्रिं. नि. उपाख्य बाबाजी आंभोरकर** यांचा प्रत्यक्षात अुतरलेला आशीर्वाद –

माझे मित्र व हितचिंतक यांच्या केवळ माझ्यावरील प्रेमामुळे मूर्त स्वरूपांत साकार झालेले माझे स्वप्न ··· ···माझा पहिला कवितासंग्रह··· · ····

## पुष्पगंधा—

मराठी माझी मायबोली आणि मी मराठीचा एक जिद्दी वाचक आहे. नवीन काव्य प्रकाराचा ( नवकाव्याचा ) वाचक असून देखील ती धाटणी माझ्या कवितांनी घेतली नाही, याची मला जाणीव आहे. अुत्स्फूर्त कल्पनांनी जो कोणता आकार धारण केला तो अत्यंत प्रामाणिकपणे मी रसिकांसमोर ठेवण्याचे धाडस करीत आहे. माझ्या कवितांना आजच्या प्रगत मराठी कविता-वाङ्मयात कुठले स्थान आहे हे मला सांगता यावयाचे नाही. माझा हा पहिलाच कविता संग्रह असल्यामुळे मी हाताळलेल्या वेगवेगळ्या रसांचे प्रतिनिधित्व यांत असावे अशी माझी कल्पना आहे. मुद्रणदोषांमुळे क्वचित कांही ठिकाणी अुणीव आढळल्यास रसिकांनी क्षमा करावी.

पुष्पगंधेच्या प्रकाशन कार्यात आर्थीक समस्येपासून तो अनेक प्रकारच्या अडचणीत ज्यांचे बहुमोल सहकार्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. त्यांतल्यात्यांत भंडाऱ्याचे रसिक नगराध्यक्ष श्री. नटवरलालजी पटेल, डॉ. श्री. वसन्तराव जोब व त्यांच्या सुविद्य पत्नी, भंडारा टाईम्सचे सम्पादक श्री. भास्करराव हर्डीकर, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. भाऊ

दलाल व चिटणीस श्री. मनोहर गंगणे तसेच माझे समवयस्क शालेय बंधू श्री. वसन्त गुर्जर, श्री. मधुकर आंभोरकर आणि (अुच्च शिक्षणाकरिता नुकतेच इंग्लंडला गेलेले ) श्री. अ. मु. नखाते यांचा आवर्जून उल्लेख करतो. याशिवाय प्रकाशनाचे कार्यांतील तांत्रिक अडचणींत माझे मित्र ( तरुण भारताचे संपादक मंडळांतील) श्री. नाना ठेंगडी भंडाऱ्याचे जिल्हाध्यक्ष श्री. कृ. गो. अयाचित, जिल्हा प्रसिद्धी अधिकारी श्री. मा. ग. दोडके यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. काव्यसंग्रहाची हस्तलिखित प्रत करण्यासाठी श्री. संतोष हातेकर श्री. हरिभाऊ देशमुख व श्री. प्रभाकर मखे यांनी फार कष्ट घेतले आहेत.

याशिवाय माझ्या अनेक मित्रांनी व हितचिंतकांनी दिलेल्या आर्थिक सहकार्यामुळेच मी माझा काव्य संग्रह प्रकाशित करू शकलो आहे. त्यांच्या ऋणाचा भार जन्मभर वागवण्यांत मला आनंद वाटेल.

अशोक मुद्रणालयाचे चालक श्री. अनंत हिवसे व त्यांचा कुशल कर्मचारी वर्ग यांना सुबक छपाईचे श्रेय देणे मी आवश्यक समजतो. " ग्राफार्ट " चे चालक श्री. मधुकर खेळकर यांनी सर्व कवितांचे ब्लॉक्स अल्पावधीत करून दिले. माझे मित्र व तरुण चित्रकार श्री. या. रा. देवसन्त यांनी आकर्षक मुखपृष्ठ व सर्व काव्यचित्रे स्वतःच्या प्रकृतीस्वास्थाकडे लक्ष न देता उत्तम करून दिली. हे त्यांच्या माझ्यावरील प्रेमाचेच द्योतक होय.

वेळोवेळी ज्यांनी माझा या क्षेत्रांतील उत्साह वाढविला व टिकविला ते माझे स्फूर्तीस्थान श्री. बाबासाहेब पुरंदरे, पुणे व कविवर्य कुसुमाग्रज, नाशिक आणि पुष्पगंधेला योग्य ती प्रस्तावना लिहून आशीर्वाद दिल्याबद्दल श्री. भाऊसाहेब माडखोलकर, सम्पादक दै. तरुण भारत, नागपूर या सर्वांना मी अत्यंत आदरपूर्वक अभिवादन करतो.

माझ्या आयुष्यांतील हा क्रांतिकारी क्षण पहायला आज माझे वडील असते तर........ ...........

मकर संक्रमण
१३ जाने. १९६६
भंडारा.

यशवन्त पारखी

तीर्थरूपचरणी......



*उरी कोरडी ही कवळून माती*
*राहीन मी धावत भ्रान्त राती,*
*स्मृतींचा तुझ्या गा उरला उबारा*
*असो तोच माझ्या सदा संगती—*

—यशवन्त पारखी—

# आ शी र्वा द

विदर्भातील अुदयोन्मुख तरुण कवि **श्री. यशवंत पारखी** यांच्या कवितांचा हा पहिला संग्रह " **पुष्पगंधा** " या नांवाने रसिकांपुढे येत आहे. श्री. पारखी यांचे आजपर्यंतचे कष्टमय अस्थिर जीवन ध्यानांत घेतले असता, आपल्या हृदयात अंकुरित झालेला काव्यस्फूर्तीचा कोंब त्यांनी प्रतिकूल परिस्थितीमुळे करपून जाऊ दिला नाही. त्याची जिवाभावाने जोपासना केली आणि त्याला बहर आलेला पाहिला, ही गोष्ट त्यांच्या साहित्याच्या बाबतीतील जीवननिष्ठेचं निदर्शक आहे, असे मी समजतो. इंग्रजी कवि '**ग्रे**' याने आपल्या जगद्विख्यात विलापिकेत असे अुद्गार काढलेले आहेत की "**दारिद्र्याच्या गारठ्याने अनेक उदात्त काव्यांकुर कोळपून नष्ट होतात.**" तशी गति **श्री. पारखी** यांच्या काव्यस्फूर्तीची झाली नाही हे सुदैव होय, किंबहुना या त्यांच्या पहिल्याच संग्रहातील **कवितांची नाजूक रचना आणि त्यांतील हळुवार भावना** पाहिल्यावर रसिकांनाही या सुदैवाबद्दल आनंद वाटेल.

**श्री. पारखी** यांच्या या काव्यसंग्रहांत तारुण्यसहज भावनांचाच आविष्कार दृष्टीस पडावा, यांत अस्वाभाविक कांहीच नाही. पण त्या बरोबरच त्या भावना ज्या संयमाने व्यक्त केलेल्या आहेत, तो पाहून मात्र थोडे नवल वाटते, अलिकडील नवकवितेत जो सगळया प्रकारचा अवखळपणा दृष्टीस पडतो त्याचा यत्किंचितही संसर्ग या काव्यसंग्रहाला लागलेला नाही, **भावनांची कोमलता, रूचिरता आणि सात्विकता हे त्यांच्या कवितेचे आत्मीय गुण** म्हणून सांगता येतील व ते गुण हाच तिचा '**पुष्पगंध**' होय, असे म्हटल्यास चूक होणार नाही. मात्र **हा गंध रातराणीच्या फुलांच्या सुवासा-सारखा मंद आणि सौम्य आहे.**

आपल्या कवितेच्या बाबतीत रचनेची शीथिलता किंवा व्याकरणदोष हे लक्षांत घेण्याची पद्धत नाही, तरी सुद्धा **श्री. पारखी** यांची एकंदरीत रचनेच्या आणि भाषेच्या बाबतीतील दक्षता ध्यानांत येऊन मला त्यांना इशारा देणे अवश्य वाटते. सामान्यतः त्यांची रचना बरीच शुद्ध आहे पण, "मराठी छातिचा दगडी सिमेचा कोट जो आहे" आणि, "करी गोदावरीच्या घालुनी कर पैनगंगेने ! जणूं सहकार सांगितला विकासाकारणी आहे." इत्यादी सदोष ओळी त्यांनी स्वतःच जर काळजीपूर्वक वाचल्या तर त्यांतलि रचनेचे आणि भाषेचे दोष त्यांच्या आपोआप ध्यानांत येतील पण अशी दोषस्थळे बेताची आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. म्हणून **श्री. पारखी** यांना

माझी अशी आग्रहाची सूचना आहे की, जुन्या आणि नव्या मराठी कवींचा काळजीपूर्वक व्यासंग करुन व त्याबरोबरच जुन्या आणि नव्या छंदःशास्त्राचाहि अभ्यास करुन आपली रचना शक्य तितकी निर्दोष करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा.

**श्री. पारखी** यांच्या ठिकाणी ऋजुता, कोमलता, कल्पकता इत्यादी काव्यरचनेला आवश्यक असलेले गुण बीजरूपाने असून त्यांची भाषाहि फार गोड आणि अत्यंत हळुवार आहे. आपल्या काव्यगुणांचा विकास जर त्यांनी चिकाटीने केला तर **त्यांना खरोखरच उज्वल भविष्यकाळ आहे**, असे म्हणावयाला मला शंका वाटत नाही.

नागपूर
१९-१२-६५

**ग. त्र्यं. माडखोलकर**

# समर्पण



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५५५४
... शाखा (...)

चरणावरचे पुष्प तुझ्या मी,
नसेल रंग सुगंध

अर्पियला परि अंतरातला
निर्मल भावमरंद

चरणरजांतुन तुझ्या पाझरे
अखंड संजीवन

तुझीच मूर्ति मनात कोरित
घेतो पदि लोळण



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
...क्रम ........................ दि: ........................
...... ........................ ... ...........................

नको कुणाच्या भालावरचे
अभिमानाचे स्थान

नको शोभणे कुंतलपाशी,
शवावरी तोरण

कधी न धरिला स्वर्गसुखाचा,
इंद्रपदाचा ध्यास

तुझ्या भक्तिविण सुधारसाचा
ना धरिला अभिलाष

तुझ्या प्रसादे उज्वळ होवो,
जीवन मातीमोल

जन्मोजन्मी तव चरणांवर
होवो मन्मन फूल.

*
*
*

आकाशवाणी, नागपूर




वेड मला वेड मला

पुनवेच्या चंदेरी
किरणांच्या पंखांचे
चंद्राच्या पाठीवर
रेखांकित हरिणाचे
डोळ्यांनी मिचकावित
लुकलुकत्या ताऱ्यांचे
समाधिस्थ गगनाच्या
निळवंती मौनाचे
धरतीच्या प्रेमाच्या
पूर्तीस्तव खेचुनिया
मीलनांत जळलेल्या
बेगुमान... ... .... !
उल्केच्या वेडाचे
वेड मला वेड मला

वेड मला वेड मला

धडधडत्या गडगडत्या
आषाढी मेघांचे

नको कुणाच्या भालावरचे
अभिमानाचे स्थान
नको शोभणे कुंतलपाशी,
शवावरी तोरण

कधी न धरिला स्वर्गसुखाचा,
इंद्रपदाचा ध्यास
तुझ्या भक्तिविण सुधारसाचा
ना धरिला अभिलाष

तुझ्या प्रसादे उज्वल होवो,
जीवन मातीमोल
जन्मोजन्मी तव चरणांवर
होवो मन्मन फूल.

*
*
*

आकाशवाणी, नागपूर




वेड मला वेड मला
पुनवेच्या चंदेरी
किरणांच्या पंखांचे
चंद्राच्या पाठीवर
रेखांकित हरिणाचे
डोळ्यांनी मिचकावित
लुकलुकत्या ताऱ्यांचे
समाधिस्थ गगनाच्या
निळवंती मौनाचे
धरतीच्या प्रेमाच्या
पूर्तीस्तव खेचुनिया
मीलनांत जळलेल्या
बेगुमान... ... .... !
उल्केच्या वेडाचे
वेड मला वेड मला

ooo

वेड मला वेड मला
धडधडत्या गडगडत्या
आषाढी मेघांचे

इंद्रधनू रंगांचे
तडतडल्या कडकडल्या
चमचमत्या चपलेचे
धरणीवर कोसळल्या
जलवंती वर्षेचे
ओलेल्या गंधवती
मातीच्या गंधाचे
सोसाटत फुफाटत
वादळल्या वाऱ्याचे
हेलावत रोरावत
अुधाणल्या दर्याचे
सळसळत्या फेसळत्या
खडकावर कोसळत्या
लाटेच्या वेडाचे
वेड मला वेड मला

वेड मला वेड मला
रमणीच्या रेशिमशा
मउ कुरळ्या केसांचे
गालाच्या खळिमधुनी
दडलेल्या तिलकाचे
अुन्मादक अुरभेदी

मृगनयनी नजरेचे
आतुरल्या ओलवल्या
अर्धस्फुट ओठांचे
मोत्यांच्या ओघळ्या
हारासम हसण्याचे
केतकिच्या कोमलशा
कांतीवर करकमली
कंकणांत किणकिणत्या
नादाच्या वेडाचे
वेड मला वेड मला

वेड मला वेड मला

कवितेच्या वेलीवर
शब्दांच्या कुसुमांतिल
अर्थाच्या गंधाचे
त्याहुनही रसलोलुप
रसिकांच्या रसनेचे
वेड मला वेड मला.

आकाशवाणी नागपूर,




अंधारी रात्र अशी
किरकिरती रातकिडे
निर्जन ह्या रानांतुन
पेंगुळती वाट दडे

पेंगुळल्या वाटेवर
पदचिन्हे पुसलेली
अजुनि मूक नीरवता
आसुसली आसुसली

आसुसली नीरवता
नुपुरांच्या नादास्तव
पेंगुळती वाट तुझ्या
झुरते पद-घातास्तव

झुरते ही पायवाट
हृ द य —स्पंदासरशी
किराकिरती रातकिडे
अंधारी रात्र अशी.

* * *

आकाशवाणी, नागपूर



# कवडसा

ह्याच शिळेवर खोदित बसलो
तुझ्या प्रीतिची कोरिव लेणी
आळविले बांबूचे अलगुज
अुच्छ्वासांतुन म्हटली गाणी

ह्याच शिळेवर जुळवित होतो
तुझे नि माझे एकच गाणे
तुझ्या वेणींतिल मुग्ध कळ्यांतुन
फुलवित होतो नवे तराणे

ह्याच शिळेवर आता बसतो
आळवीत ते जुनाट अलगुज
बघतो कोरिव लेणी, अैकत—
वाऱ्यावर गीतांची कुजबुज

ह्याच शिळेवर विसांवतो अन्
कधीं मधी येऊन कुठेसा
अंतरांतला दीप पाडतो
आठवणीचा गोल कवडसा

×

×

×




अमावसेची गर्द काजळी
निशा पसरली गिरिकुहरांतुन

शय्येवर निद्राधिन सृष्टी
काजळ भिनले कणांकणांतुन

अुभा स्मशानी जुनाट पिंपळ
पान तयाचे हळू सळसळे

घुबड ओरडे अुडे काजवा
किरणशलाका मधेच अुसळे


अुरांत अजुनी गूढ जागते
भावतंतुच्या गांठी पाडित

प्रतिभेला हळुं फुटे पालवी
दाह व्यथेचा विझवित विझवित

हृद्‌चक्षूंची मिटे पापणी
अुरांत अूर्मी सूप्त जाहल्या

अुसळुन आले अबोध कांही
निगूढतेच्या गांठी सुटल्या.

आकाशवाणी, नागपूर



आज अुमजले तुझ्या मनांतिल
मुग्ध, लाजरे, अबोल हृद्गत
आणि भराभर अुसळुन आले
मदंतरीचे कांही अद्भुत

नकळत सुटल्या अद्भुततेतुन
मुक्या प्रीतिच्या रेशिमगांठी
सभोवतीचे वैभव विसरून
धांवत आले तुझ्याचसाठी

आजवरी मम हृद्नौकेच्या
शिडांत भरला होता वारा
अुफाळलेल्या लाटांवरती
होते शोधित जोडीदारा

अमावसेच्या गर्द तमाचे
आज जाहले रम्य चांदणे
तुझ्या नि माझ्या मिठींत राया
बघ अंकुरली अुजाड राने

आज अुमजळे तुझ्या मनांतिल
गूढ, सहेतुक, अवीट हृद्गत
अुसळुन आले आज अचानक
भावमंथनी प्रीतीअमृत.

# तांबुल

आलो एक दिनी सखे तव गृही मी पाहुणा होउनी
शेवंतीसम गौरवर्ण तव तो घाली मना मोहिनी
कांहीं क्षुल्लक कारणे हुडकुनी घोटाळली भोवती
स्वेच्छे गुजत भावगीत वदनी गांधीलमाशी प्रती

होता भोजन आंचवून उठलो संतृप्त झालो मनी
गेलो खोलिमधे, दिली मम तनू शय्येवरी लोटुनी
आली तूं तितुक्यांत लाजत मनी घेवोनिया तांबुल
हातांनी निज अर्पिता मम मुखी काहूरले वादळ

झालो दिङ्मुढ लाजलो मम हृदी तू हांसली जेधवा
मुग्धे तूं वदतांच "ओष्ठयुगलां माझ्या तुम्ही रगवा"
देखूनी मज स्वस्थचित्त सखये किंचित् पुढे वांकुन
माझे आसुसल्या विलोल अधरे त्वां घेतले चुंबन–

काळाच्या उदरांत तो दिन अतां गेला कुठे लोपुनी
आहे मात्र अवीट ही स्मृति हृदी माझ्या प्रिये आजुनी

# माझ्या ज्ञानेशाचा बोल

माझ्या ज्ञानेशाचा बोल
आहे नभाहुनी खोल
ऐरावतापरी डौल .... ... .... त्रिभुवनी

ज्याचा अर्थ मकरंद
करी रसिकाला धुंद
आणी आगळा सुगंध..........वेड लावी.

जैसी शारद पुनीव
करी किरण वर्षाव
आणि चकोरांचा गांव ... .... आनंदला

तैसा ज्ञानेशाचा शद्ब
करी रसिकांना लुब्ध
जेव्हां नऊरसी ओघ ...... वाहू लागे.


अमृतही गयावया—
करी, पडे याच्या पायां
म्हणे ज्ञानदेव राया......... दया ठेव

आले मराठीच्या दारी
पांची इंद्रीय – भिकारी
म्हणे सुख थोडे तरी ....... दे व ऽ माये

स्पर्शे स्पर्श तृप्त झाला,
जिव्हा, नेत्र, कान, धाला
नासिकाही म्हणे मला ....... अरूं द्याहो

ज्ञानेशाचा शब्द गोड
वर्षे अमृत आषाढ
श्रुती–चातकांचे लाड ... ... पुरतील.

माणूस–पुणें, दि. अं. ६२




सागरतळचा अनल हवा
अन क्षितिजाचा मज वांक हवा
गगनाचा विस्तार हवा
मज धरतीचा मृद्‌गंध हवा.

गजराजाचा झोक हवा
मज विश्वाचा अधिकार हवा
शेषाचे सिंहासन हिसकुन
धरतीचा शिरी भार हवा.

तरफेचा मज तोल हवा
अन ध्वनि, तेजाचा वेग हवा
रबरामधला ताण हवा
मज पाऱ्याचा अभिमान हवा.

सूर्यकरांतुन शीतलता अन
चंद्रकरांतुन हवी ऊष्णता
काळामधला अंश लघूत्तम
व्यापामधला व्याप हवा.

इंद्रधनूंच्या सूत्रामधुनी
उडुरत्नांची गुंफुनि माला
गळयांत घालुनि, करांत एका
धूमकेतुचा गुच्छ हवा.

शाम ढगांचा अश्व हवा, करि
चपलेचा चाबूक हवा
औदुंबरसुमगंध हवा मज
जगावेगळा छंद हवा.

राज्य नको ऐश्वर्य नको मज
विश्वाचा अधिकार हवा,
स्वप्नांचा आभास असो
पण धुंदीचा क्षणकाल हवा.

आकाशवाणी, नागपूर.

# स्त्री-दाक्षिण्य



वामकुक्षितुन
अुठुनि अचानक
कपाळावरी
सतरा आठ्या
केस विखुरले
वदनावरती
पहात बसलो
गवाक्षातुनी
रस्त्यावरची
गडबडघाई
निश्वासानिज
रोखत सोडत
पहात बसलो
□ □

असेल वेळा
पांच वाजता
सुटले ऑफिस
सुटल्या शाळा
कितीक जमले
गटागटाने
पानमंदिरी
हॉटेलांतुन.
गवाक्षातुनी
नजर भिरभिरे
आणि अडखळे
नजर अचानक
कुणी चालली.

सुंदर युवती
मंजुळ मैना
बालिश ललना
लाजत लचकत
हृदये तुडवित
कितिक जणांची
पायाखाली.
नयनी काजळ
वर्ण केतकी
काळी नागिण
रुळे पाठिवर,
रेखुन अपुल्या
विशाल भाली
तिळाएवढी
कुंकुम टिकली,
सरळ नासिका
सुरक्त अधरा
नाजुक जिवणी
गाल गुलाबी.
मत्त गजापरि
तिचे चालणे
सौंदर्याचे
मादक दर्शन.

सावर ! पडला
पदर ओघळुन
स्तन युग्मांचे
धुंद प्रदर्शन.
असेल कोण्या
बड्याबड्याची
धर्मचारिणी,
छटेल कन्यका.
रस्त्यावरती
उभे राहती
लोक आपुल्या
जिभल्या चाटित.
कुणा वाटते
खांद्याला तिज
एक गोडसा
द्यावा हिसका,
कुणी चिंतितो
अपघातांतुन
वांचविण्या तिज
आपण जावे
× × ×
चालत होती
वृद्धा कोणी


टेकित काठी
बाजारांतुन.
दात सुरकुत्या
सर्वांगावर
वांकुन चाले
धवलकेशिनी,
शिरी टोपली
धान्य तिच्यातुन.

× × ×

आणि अचानक
रुमाल हिरवा
नवयुवतीच्या
गौर करातुन
गेला निसटुन.
वीर धांवले
आणि सरसावुन
स्त्री जातीच्या
दाक्षिण्यास्तव.
शूर एकजण
जणू दौडला
तिरासारखा
दाक्षिण्यास्तव,
अडखळला अन
शूर बहाद्दर
त्या वृद्धेला
आणि सांडली
तिची टोपली.
धान्य पसरले
रस्त्यावरती,
संधी हुकली
रुमाल गेला
मिळे दुज्याला
दुःखी बिचारा
शूर बहाद्दर.
शिवी हांसडुन
अचकट विचकट
खेकसला तो
वृद्धेवर त्या
" दिखता नहि क्या ? "

स्त्री जातीच्या
दाक्षिण्यास्तव
स्त्री जातीच्या
दाक्षिण्यास्तव.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९५५५८




ज्योत आज ही जरि मिणमिणती
विशाल विश्वामधी न गणती
अुद्यां चेतविल विशाल ज्वाला
झणी ग्रासतिल त्या गगनाला.

वाट पुढे तव बघ कंटकमय
निबिड तमांतरी कां वाटे भय ?
पाजळ घे करि मशाल ही नव
दडे कुठे तम तो मज दाखव ?

दाखव दीप्ती या जगताला
अुजळुन दे तम सागरातला
मरूस्थलातुन जा रानातुन
दे अवघी ही सृष्टी अुजळुन.

तव अंतर्मन जरा अुजळु दे
निजहृदयी तव दृष्टिकिरण दे
कृतपापाचे घृत घे जाळुन
सत्य समज रे झाले क्षालन.

या ज्वालेची त्वां न कल्पना
यदा अुंचविल निज जिव्हांना
पृथ्वी अवघी अुजळुन देइल
सूर्य चंद्रमा तारे दिपतिल.

सृष्टियंत्र हे जाइल बदलुन
खगोलमाला तुटेल खळ्कन
सोडुन अपुले जुने वलयपथ
ज्योतीभंवती दौडतील रथ.

द्वैत दग्ध अद्वैत अुठू दे,
आत्मज्योति ह्या एक तेवु दे,
चराचरातुन हेच घुमू दे,
वान्हिदेव, हा एकच वर दे.




पाखरांनो पाखरांनो
जा उडा दाही दिशांना

आजवरि रे बद्ध होता
पारतंत्री पिंजऱ्यात
सोशिले तुम्ही व्यथांना
स्वैरतेच्या वंचनेत
मुक्त केले आज तुम्हा
आवरा रे आसवांना ··· ··· ··· ···· जा उडा.


जाळले मी पोळले मी
तव मनीच्या भावनांना
मद्‌हृदीच्या क्रूर वांच्छा
तृप्त केल्या हासताना
भंगले तव जीवनाच्या
स्वप्नरूपी मी सुमांना ··· ··· ··· ··· जा उडा.

शमविली का आग उरिची
आसवांना प्राशुनी ?
तेच अश्रू आज गळती
माझिया नेत्रांतुनी

आग तुमच्या अंतरीची
जाळते माझ्या मना .... ... ... ... जा उडा

पाखरांनो, पाखरांनो जा उडा दाही दिशांना.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
०६११० दि: ०१/०५
२०६९ नों दि: ३०/३/०७




हे विश्व काय मजपुढती ?
धूलीकण वाऱ्यावरती

जणुं कीटक हत्तीपुढती
वा तरूपुढे तृणपाती.

मी चुंबिन आकाशाला
अधळीन चांदण्या साऱ्या

करतळी झेलुनी उल्का
घेईन शोषुनी वारा.

करि इन्द्रचाप घेउनिया
माखीन हात रंगात
भेदीन सूर्यबिंबाला
भिरकाविन अवकाशांत.

बुचकाळुनि दाहि दिशांना
दावीन सप्तपाताळ
चंद्राला मारून टिचकी
देईन ढकलुनी त्यांत.

करकरा क्षितिज मोडीन
शुक्राचा तुडविन साज
मेघांवर मारुनि फुंक
वरुणाचा उतरिन माज.

कां दिमाख दावी धरती ?
शेषाचे फोडीन शीर
टाकीन थुंकुनी साऱ्या
सरिता मुख प्रक्षाळून.

हे हिमालयासम गोटे
मज विशेष नाही मोठे
वेधून दूरचे तारे
पाडीन ग्रहांना खाली.

हिसकीन दिवसरात्रीच्या
पांढऱ्या कृष्ण पटलांना
फिरवीन फाडुनी वस्त्रा
ऊषा अन् संध्या नग्ना.


किरिटात खोचले आहे
हे धूमकेतुचे पीस
मी सागर ढवळुन साती
मोत्यांची रचली रास.

ज्ञानेश्वर, वाल्मिकि, व्यास,
कृष्णार्जुन, रघु, शिवबास–
तेजःकण एकच दिधला
खलनिर्दालन करण्यास.

❀ ❀ ❀

का पटली ओळख माझी ?
मी विश्वाचा अधिकारी
घालील चराचर आता
लोटांगण माझ्यापुढती.

युगवाणी,–नागपूर, सप्टें. ६१




मूक नभाला वदतो सागर,
" सतत प्राशतो तुझे निळेपण
तुझ्या पोटिच्या अंधाराचा
टिपून घेतो हळूच कणकण.

घेत निशेचा मादक शीतल
गंध ओलसर नकळत हुंगुन
तुझ्या भाळिच्या अुडुरत्नांना
जलपटलावर घेतो रेखुन.

स्कंधावर क्षितिजाच्या रेलुन
अुभा माझिया निकट सदा तूं
रुप गोजिरे तुझे अुमटते
रुपात माझ्या, मूक परी तू.


मानव म्हणतो, "प्रशान्त सागर
विशाल हृदयी शांती आगर."
कुठे परी तव मूक शांतता ?
नांदे चंचलता लाटावर.

जाणवते मज तव गंभिरता
गूढ शांतता, मुके निळेपण
युगायुगाचे सांकळलेले
तुझ्या व्यथेचे हळवे स्पंदन.

रूपात माझ्या तुझी वसू दे
गांभिरता अन् मुके निळेपण
हवी मला तव गूढ शांतता
हवे व्यथेचे हळवे स्पंदन."

सागर पुशितो मूक नभाला
तुषार लाटा निज अुंचावुन,
मुकेपणातच नभ गहिवरते
अबोध अजुनी मुके निळेपण.

आकाशवाणी, नागपूर.




नील नभांतिल एक चांदणी
तन्मय होउन गाते गाणी
त्यांत अुमटते तिची कहाणी
वाऱ्यावरती, किरणावरती
लहरत आली माझ्या कानी,

" निळ्या सांवळ्या विशालरानी
वृक्षवल्लरी इथे न पाणी,
जिकडे तिकडे माझ्या बहिणी
सूर्यचन्द्रमा सभोति पिंगा
घालित मीही दाहि दिशांनी;
सूर्याचे नच प्रेम कुणांवर
कुणा न घेई अपुल्या ध्यानी.
पूर्ण चंद्रमा सुखकर, शीतल
रुप जयाचे राजसवाणी,
धडपड अमुची मीही तयांवर
प्रीत पंक्तिची गाते गाणी.
मूल्य तयाचे कुणा न मिळते
म्हणुनि सांगते ही रडगाणी.
प्रीत तयाची सदा निछावर
ती बघ हंसते शुक्रचांदणी.
प्रीत सुमांची वृष्टी तिच्यावर
सदा अुगवते निकट राहुनी;
हिच्याच पायी तापुन तापुन

अुड्या घालती माझ्या बाहिणी,
अुल्का होउन, त्यागित जीवन
तरिही हसते शुक्रचांदणी
कैफात प्रीतिच्या, रुपगर्विता.
एके दिवशी मीही ठेविन
अुल्का होउन माझे जीवन
प्रितियज्ञाच्या बलिवेदीवर
अर्पुनि देहा, सार्थक काल्पिन—"

नील नभातिल एक चांदणी
तन्मय होउन गाते गाणी
वाऱ्यावरती, किरणावरती
लहरत आली माझ्या कानी.

युगवाणी–नागपूर, दि. अं. ६२.

# आई


गहिवरले मम हृदय अता
गे आई तुजला आठवता

वात्सल्याचे अमृत शिंपुन
घातलीस मायेची पखरण
मना जाणवी तुझी न्यूनता

मजसाठी तू केले जे श्रम
फेड न होई अर्पुनि तनु मम
राहिन मी तव ऋणी सदा

तुझ्या स्मृती मी अुशास घेउन
कांटेरी मम वाट आक्रमिन
रक्षिल मजला तव ममता

हृदयविणेची तार छेडुनी
मूक आसवे वाही चरणी
आठवुनी तव पूज्य पदा
गे आई तुजला आठवता.




तारांगणी मी एक धवल घन
थाऱ्यावाचुन जगतो जीवन
श्यामल हे घन, चटोर चपला
मुदे व्यक्तवित प्रणय आपुला
कुठे तरी मी धवल एकला
स्वप्नमण्यांची गुंफित माला.
लक्ष्मिपतींच्या बड्या ना
मजसम निर्धन तया भावना
सहानुभुतिला मी मोताद
कुणी न घाली मजला साद.
स्वतंत्र आहे आज जरी मी
मनी एकला कां झुरतो मी ?
विचार एकच करि बेजार
हवी मला जल थेंबे चार.
तारांगणी मी एक धवल घन
बाष्पावाचुन जगतो आजुन.




कोजागिरिचे धवल चांदणे
हासत भूवर अतू चालले
हसू लागल्या दाहि दिशा अन्
काव्य अुरातुन स्रवू लागले.

हिरव्या पानांवर चमचमते
निळ्या निळ्या पाण्यात खेळते
कोजागिरिच्या रम्य निशेचे
मनात माझ्या स्वप्न जागते.

आज सखे तू हवीच होतिस
लुटले असते चकोर होउन
ह्या पुनवेचे मदिर चांदणे
साठविले असते हृदयातुन.

शुक्र चांदणी वरी चंद्रमा
हास्य वर्षतो अविरत अपुले
सांग कुठे तू ? माझे अंतर
तुझ्या स्मृतीने जळले जळले.

कौमुदिचा अभिसार वर्षता
अधाणला प्रेमातुर दरिया
अचंबळे तव लहर स्मृतीची
कसे शांतवू व्याकुळ हृदया ?

मुक्त हासते आज नभांगण
चंद्रकराचे चाले दोहन
धुंद होउ ये अमृत प्राशुन
ये सखये ये करुं ये नर्तन.



# समोर येतां तूं

समोर येता लाजत तू अन
अंगणिचा जास्वंद फुलावा.
लाल गुलाबा खाली डुलता
धुंद मोगरा स्वैर हसावा.

समोर येता लाजत तू अन
शिवारातला रान केवडा
कुंपणातल्या मेंदीपाशी
गूज अकलिता बनला वेडा.

समोर येता लाजत तू अन
अंग चोरतो एक पारवा
कण्हेरिच्या डाहाळीवरती
निवांत बसला घेत गारवा.

ओठावर मम असेच कांही
हृदकुसुमातिल न ये सांगता,
समोर येता लाजत तू अन
पाकळींवर ये थेंब दवाचा.





हासली तू जणु  हार  मोतियाचा
गांठ सुटुनी सर  ओघळे तयाचा,
पारिजातक  वर्षतो  पुष्परास
गंध ज्याचा स्पर्शतो अंतरास.

जणू  हिमगारा  वर्षती अुन्हात
किरण सोनेरी खुलविले तयात
लाट लाटेवर आपटे फुटे जेंव्हा
तुषारांचा संभार फुले तेंव्हा.

नभीं चवथींची चंद्रकोर यावी
मेघमाला त्या भोवती असावी
हळुच डोकावी चंद्र पुनः पुन्हा
केशलहरी खुलविती तशा वदना.

कमलपत्री जलधार कुणी ओती
दूर बगळ्यांची माळ जात राती,
चूर बर्फाचा सांडतो क्षणी एका,
आणि सखये हसलीस तू नव्हे का ?



मेघव्याप्त आकाशात लुकलुके एक तारा,
गर्दकाळ्या अंधारात सुसाटत वाहे वारा,
निर्जनश्या अरण्यात सोबतीला नाही थारा,

वेड्यापरी धावतो मी चुकलेला मार्ग सारा.

घोटाचिया आगेसाठीं आज येथे आलो नाही,
वित्ताचिया लोभापायी आज वेडा झालो नाही,
शरीराची क्षुधा नाही, ईश प्राप्ती नाही नाही,

हृदयाची वीणा आज वेगळ्याच छेडी तारा.

कुठल्याशा देवळात जायचे ते नाही ठावे ?
कुठल्याशा मूर्तीला, मी पूजणार जीवे भावे ?
आठवेना कोणते ते भक्तिगीत आळवावे ?

श्रुती ऐकतात आज वेगळाच गर्जे नारा.

जीवनाचे सारे छंद तोडीयले मायाबंध,
संसाराच्या सुखाचाही ल्वंडीला सारा गंध,
ऐहिकाच्या व्यापाराला येतो आहे दुर्गंध,

नश्वराच्या वैभवाची तोडावीशी वाटे कारा
वेड्यापरी धावतो मी चुकलेला मार्ग सारा.

# माझ्या मधल्या मी तुज पुशितो

सांग कोणते कारण होते इथे पाय ठेवला ?
माझ्या मधल्या मी तुज पुशितो थांब कुठे चालला ?
सांग काय ते अडले होते पिशा देह धारिला ?
सुखदु:खाचे अनुभव जोडुन काय अर्थ साधिला ?

आनंदाच्या कणाक्षणास्तव दुःखातहि तळमळे,
सौख्याचा क्षण एकच मिळता विवेक बुद्धी चळे.
मैथुनँ—निद्राऽहार—भयादी व्यसनांची गर्ता
त्या गर्तेतुन तूच लोटिले; सांग कशाकरिता ?

आजवरी रे तुझ्या भयास्तव किती किती सोसले,
स्वप्नसुखांच्या कणाक्षणास्तव किती दुःख भोगले,
या गर्तेतुन केवळ कांटे वरती वैशाख,
थकता; तू चांडाळा उलटा ओढियला आसूढ ?

माझ्या मधल्या मी अधमा रे काळिज नाही तुला,
मोहाच्या दोरांनी बांधुन देह पुढे लोटला,
नश्वर सारे वैभव जमवित कुठे कुठे नाचलो,
केवळ मोहासाठी झटलो, स्वस्वरुपा विसरलो.

आज अुमजले सद्गुरुं नामक आहे एक समर्थ,
विव्हळत घालिन साद तयाला देईल मज हात,
देउन मजला हात सद्गुरू काढिल गर्तेतुन;
चुंबुन त्याच्या चरणरजांना प्राशिन संजीवन !

माझ्या मधल्या मी तेंव्हा तव पुरती खोड जिरेल,
भिरकविन देहाचे ओझे आणिक तू पळशील.

×
×
×




विचित्र रंगी ढगाळलेले
हळूहळू बघ नभ काजळले.

वाजति घंटा सुटले गोधन
लोट धुळीचे खिल्लारातुन.

नभी हासतो सायंतारा
किरणांचा अुभवून पिसारा.

विरवू बघतो पूर्ण चंद्रमा
संध्येवरचा धुंद रक्तिमा.

कर अुंचावुन सागर लाटा
शोधु लागल्या नभिच्या वाटा.

रातकिडे अन हा पक्षीगण
आळवितो संध्यारागांतुन–

ज्यांत अुमटते तुझी कहाणी
विरहव्यथेचे बनते पाणी,

सांकळलेले हृदय – घटातुन
रे! ठिबके पाणी नयनातुन.

क्षणात पडते अवकाशातुन
संध्येवर तिमिराचे गुंठन.

तुझी स्मृती मग मनात दडते
परताया अन पाउल वळते.

* * *




मातृभूमिच्या मुक्तीसाठी स्वीकारून शृंखला,
परवशतेचे पाश तोडण्या तुवा सोशिल्या कळा.

स्वदेशचिंतन केवळ गणिले अवघे जीवनसार,
स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर अर्पियला संसार.

प्रासादाला तुच्छ लेखिले कवळुनि कारागार,
खळाळत्या बेड्यांचा तुझिया करचरणी शृंगार.

हसतमुखाने तुवा झेलिले गगन शिरावरती,
करालकाळाचे तांडव नमले दोन भुजापुढती.

देशमुक्तिचा घोष जेधवा रणात दुमदुमला
क्रांतिवीर ! स्वातंत्र्यवीर ! तू मृत्युंजय ठरला.

मेरुपर्वता तुफान वादळ अुधळुन लाविल का ?
करालललाटा नील नभाला धडका देतिल का ?

सींहापुढती मदोन्मत्त गज मांडिल का ठाण ?
क्रूर आंग्लशाहीचा तैसा कोसळला अभिमान.

तनमन आणिक स्वार्थकल्पना यांचा स्वाहाकार
स्वातंत्र्यास्तव तुवा घेतला तळहाती अंगार.

शब्दांना कधि कथिता येइल का तव यशगान ?
तळहाती शिर घेऊनि आलो तरीच तव मान.

मृत्युजय तू ! तुजला कसले काळाचे भय, भान ?
तुझ्या स्फूर्तिचारित्र्यदीप्तिने चेतवु अमुचे प्राण.

साप्ताहिक हिंदुविजय, हैद्राबाद
मृत्यंजयदिन विशेषांक, डिसें. ६०



# होशियार! मी सीमेवरचा भारतीय सैनिक

शस्त्र नागवे करात माझ्या अन माझी ओळख
होशियार, मी सीमेवरचा भारतीय सैनिक.

बंदुकिच्या फैरीत चालले रणचंडीचे गाणे,
धडाड्‌धुम अंगार ओकती बाम्ब, तोफखाने.
रणगाड्यांचे रुद्र नाचती तांडव, किंकाळ्या,
रक्ताच्या चिखलात लोळती देहाच्या चिरफळ्या,
रिपुरक्ताने मस्त माखले संगिनिचे टोक,
होशियार, मी सीमेवरचा भारतीय सैनिक.

शिवरायाने अम्हा शिकविले मरणे वा जिंकणे,
मातृभूमिच्या स्वातंत्र्यास्तव देह रणी सांडणे.
प्रतापराणा, तानाजीच्या वंशामधले अम्ही,
भारतभूला कधी न पडली नरसिंहांची कमी.
पुरे एकटा दहादहांना लक्ष्यवेध बिनचुक,
होशियार, मी सीमेवरचा भारतीय सैनिक.

वैनतेय का कधी पळाला पाहुनिया कावळे ?
हिमालयाचे रक्षण करती दख्खनचे मावळे.
महापराक्रमी शिकंदराने कधी अम्हा जिंकिले,
सिंधुनदीचे पाणी पाजुन परतुनिया लाविले.
कितीक आले गेले मोगल, इंग्रज, हूण, कनिष्क,
होशियार, मी सीमेवरचा भारतीय सैनिक.

त्राण सतीचे घेउनि हाती काय भ्यायचे काळा ?
गळ्यात अमुच्या कधीच पडल्या विजयांच्या माळा.
हिंदविरांच्या परंपरेला भूषण आम्ही ठरू,
चीन असो वा पाकिस्तानी पुरून त्यांना उरू.
डोळ्यापुढती केवळ नरडी शत्रूची आणिक,
होशियार, मी सीमेवरचा भारतीय सैनिक.

खुशाल आता नाच भैरवा रणांगणावरती,
गळ्यात घालुन रक्तरंगली शत्रूंची मुंडकी.
कडकडु दे दशदिशा, फाटु दे पायतळी धरती,
कोसळु दे आकाश परंतू निशाण हे वरती.
प्राणाहुतिला सजलो आम्ही देशाचे पाइक,
होशियार, मी सीमेवरचा भारतीय सैनिक.

मराठी ग्रंथसंग्रहालय
दा. क. ९५५५८
शाखा

दै. तरुणभारत–नागपूर,
स्वातंत्र्यदिन विशेषांक १९६५.

# कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांस-

नमन असो तुज रवींद्रनाथा नमन असो शतवार,
कविरत्ना तव हिंदसुपुत्रा जयजयकार त्रिवार.

वाङ्मयाक्षितिजावरती पूर्वा तुझ्यामुळे उगवली,
गीतांजलि-सूर्याची किरणे विश्वातुन फाकली.

पारतंत्र्य काळात त्यागिला ऐश्वर्यासह मान,
देशमुक्तीचे असिधाराव्रत अंगिकारि बलिदान.

अखिल भेद विसरून शिकविता विद्याधर्म भला,
शांतिनिकेतन नभी फडकवी कीर्तिध्वज अपुला.

जनगणमन अधिनायक कवना गाशी हिंदवीरा,
कविवर्या तू स्विकार माझा मानाचा मुजरा.

मुलांचे मासिक—नागपूर, डिसें. ६१

# महाराष्ट्र राज्य आणि यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री यांच्या गौरवपर.

मराठ्यांची ध्वजा उत्तुंग आकाशी उभी आहे,
महाराष्ट्रांतली देवी भवानी तोषली आहे.

मराठी रासदासाचा, तुक्याचा बोल घुमताहे,
सुभाषा ज्ञानदेवाची सुधेशी पैज करताहे.

महाराष्ट्रांतली माती मराठी मातिचे वाडे,
मराठा करविता कर्ता मराठी जिद्द ही आहे.

मराठा जन्मला येथे मराठा पोसला येथे,
मराठ्यांच्या कमाईच्या महाराष्ट्रात तो आहे.

मराठी छातिचा दगडी सिमेचा कोट जो आहे,
मराठी मनगटांवरती भरोसा भारता आहे.

मराठी राज्यशकटाचा मराठा सारथी आहे,
मराठी राज्यदरबारी मराठा मावळा आहे.

मराठी आसनावरती मराठी वारसा आहे,
शिवाजीच्याच आत्म्याची तयाला मान्यता आहे.

उठा निद्रेतुनी जागे, उठा स्वप्नातुनी जागे,
मशाली घेउनी हाती तमी कोणी उभा आहे.

महाराष्ट्रा ! विकासाची तुतारी वाजते आहे,
तुझ्या स्वप्नातल्या आशा पहा साकार होताहे.

विदर्भी वैनगंगेला मिळाया कोयना धावे,
सातपुडातला वारा सह्याद्रीच्या शिरी वाहे.

करी गोदावरीच्या घालुनी कर पैनगंगेने,
जणू सहकार सांगितला विकासा कारणी आहे.

विकासाच्या गिरीशिखरी जसा नेता हवा होता,
मराठ्यांचीच पुण्याई तसा तो लाभला आहे.

महाराष्ट्रातली जनता जया विश्वासली आहे,
यशोवन्तास त्या मुजरा कवी यशवन्त करताहे.

* * *




दंवात ओल्या
दिशा नाहल्या
आणि लाजल्या
वस्त्री भिजल्या
निशिकिरणांच्या...

लाल कंचुकी
लाल ओढणी
वस्त्र कोरडे
बदलित होत्या.
रवीराजसा
पुढे स्वागता
शृंगाराचा
चढवित होत्या
साज मनोहर.

वस्त्र गुलाबी
पेहरत होत्या
निज अंगांवर.

आणी अवाचित
अवखळ वारा
संधी साधुन
नेई पळवुन
वस्त्र रेशमी,
खिजवित खिजवित
दिग्युवतींना
डोळे मिचकित,
जिव्हा दाखवित
आणि वांकुल्या.


दिधले ठेवुन
वस्त्र गुलाबी
क्षितिज कडेवर.
खिजवित होता
अन पक्षीगण
कलरव किलबिल
दिग्युवतींना,
बेर त्यांत की
कितीक तारे
कधीच आपुल्या
किरणांच्या पंखावर बसुनी
निघून गेले घरट्यामधुनी.
अजून जागृत
झाला नव्हता
वट, पिंपळ तो
कुठे कुठे त्याच्या पानांवर
अुरे लाजरी
निशा देविची धूळ काजळी,

आणि अचानक
रविराजाच्या
किरणदुतांची
हो ललकारी,
बावरल्यागत
दिशा जाहल्या.

बावरल्यागत
दिशा जाहल्या
लगेच धावल्या
सर्वजणी मग
लगबग लगबग
झरझर झरझर
आतुर अंतर
क्षितिज कडेवर
आणि पोचली
सर्वांआधी

पूर्वा सुंदरा—

* * *




येते मनात माझ्या
नभि अुंच झेप घ्यावी,
पाहून पंख खुरटे
मनिषा मनी विरावी.

येते मनात माझ्या
मधुगीत आंळवावे,
पिचल्या गळ्यात कुठले
संगीत ते खुलावे ?

येते मनात माझ्या
गाठीन पैलतीर,
भडकेल तारु माझे
नाही सुकाणु दोर.

येते मनात माझ्या
उत्तुंग वृक्ष व्हावे,
जीवन तयास कुठले ?
आगीत दग्ध व्हावे.

येते मनात माझ्या
कांहीतरी करावे,
ऐसे कि शेवटी
मी कीर्तिरूपे उरावे.

धण— सुटला मनात माझ्या
सोसाट धुंद वारा,
पसरून उष्ण वाळू
झाला पहा सहारा.

होत्या मनात माझ्या
उत्तुंग त्या मनीषा,
परी हाय ! हाय ! काळा !
दिसल्या कशा निराशा.

दिसतो मनात माझ्या
तम दाट दाट घोर,
असलाच किरण एक
कुठला प्रभाव थोर ?

आकाशवाणी, नागपूर.



# विसरलीस का?

जा मेघांनो, कळवा तिजला अखेरचे गीत
विसरलीस का चांदण्यात ती भिजलेली रात ?


झुळझुळत्या ओढ्याच्या काठी राममंदिरात
सुवर्णपुष्पे उधळित होती एक सांजवात,
करात कर गुंफून घेतली स्मरते का शपथ—

पूर्ण चन्द्रमा नभात होता वर्षत मधुधार,
वक्षावरती माझ्या होती टेकुन तू शीर,
ओठांवर तव मी ओठांनी लिहले जे गीत—

सुखावलेली प्रीतबंधनी हृदये मौनात
पाण्यामधुनी फुलले होते उत्कट संगीत,
आठव उरला आता केवळ माझ्या हृदयात—

तुझे नि माझे अन्तर आता सांग मिटावे कसे?
पुनः पुन्हा तुज आठवण्याचे पहा लागले पिसे,
जळेल का ही ज्योत प्रीतिची विरह वादळात,
विसरलीस का चांदण्यात ती भिजलेली रात?

जा मेघांनो, कळवा तिजला अखेरचे गीत.



# विलापिका


ढासळलेल्या बुरूजापाशी एक मोडका माड,
कांटेरी झुडुपांनी भरले माळरान ओसाड.

पायथ्यास बुरूजाच्या होते थडगे एक जुनाट,
थांबत होती त्या थडग्याशी तिथली पाउल वाट.

रखरखलेली वैशाखाची होती एक दुपार,
टाकित होती उष्ण उसासे, जळता अंगार.

अशा अवेळी थडग्यावरती शिर टेकुनि बसलेला,
कुणी वेडसर अळवीत होता थडग्यातील सजणीला.

प्रिये प्रेमले गेलिस तू अन तुझ्यासवे जीवन,
तप्त वालुका सभोवतीचा जाळी तुजवाचुन.




तुझ्या मनाचा मिनार
चुंबी निळ्या आकाशाला,
धुळीतला पायथ्याशी
जीव माझा आसावला.


तुझ्या मुखड्याचा चांद
माझ्या चकोराला भारी,
कैशा चातकाने प्याव्या
सांग श्रावणाच्या सरी.

तुझा सागर माझिया
टिटवीला मोजवेना,
तुझ्या डोळींचे क्षितिज
माझ्या कवेत मावेना.

तुझ्या स्वातीच्या थेंबाने
माझी शिंप वाहू लागे,
तुला बांधून ठेवाया
आखुडले सारे धागे.

चुंबी निळ्या आकाशाला
तुझ्या मनाचा मिनार,
पायथ्याला जीव माझा
बसे मोजी अंतर.

कथासागर–मुंबई, आक्टो. ६१




उदकाडी मधुगंध वितरते जाळुन निज जीवन,
सुखेनैव निज काया झिजवी गंधास्तव चंदन,
सुखवित शीतल छाया अपुली उंच उभा पिंपळ,
तृषा भागवित वाहे सरिता संजीवक निर्मळ.

कधी शाश्वती, कुणी दिली का विश्वाची, देहाची ?
कधी मिळाली, कुणाकुणाला कुपी अमृताची ?
कुणा मिळाला जगी आजवर वर अमरत्वाचा ?
कुठे दाखवा शेष स्मृतीकण एकच आद्ययुगाचा ?

तोडित, फोडित, पुनरपि घडवित इतिहासाची पाने—
उलटित, उभवुन काळ धावतो क्रान्तींचीच निशाणे,
सुटेल ना कधि कुणी तयाच्या विनष्ट चरकातुनी,
कोण वांचविल तया अभागा मित्र, धर्मचारिणी ?

सदा सांगती उदकाडी अन् वृक्ष, नदी, चंदन;
त्याग, नीति, उपकार आचरून सार्थ करा जीवन.

❀ ❀ ❀

प्रज्ञालोक–नागपूर, आक्टो. ६१.

# श्री शारदेस

भक्तिसुमने अर्पिते तव शारदे चरणावरी,
घेउनी माळा करी मी आज आले मंदिरी.

गौरकाया, मुक्तकेशा आसनी कमलावरी,
रत्नमंडित किरिट तुझिया शोभतो शीरावरी.

वामबाहू शोभतो जो ठेविला वीणेवरी,
विश्वगीता छेडिशी ते स्पर्शु दे माझ्या उरी.

रंग नाही, गंध नाही, रूप नाही तिळभरी,
ओतिली मी अंतरीच्या भावनेची माधुरी.

गीत गाते शारदे आशीर्वचाला आतुरी,
अल्पधी मी विनविते तू खुलव माझी वैखरी.

* * *

# रसिकांनो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५५४
ग्रंथ

बोलीन बोबडे बोल करूनि घ्या गोड,
रसिकांनो पुरवा तुम्हीच माझे कोड.

वाहिली फुले ही रंग, वास नसताही,
पण भक्तिभावना त्यात शोधुनी पाही.

ही नसेल सनई सुस्वर, परि अंगाई,
हृदयाचे दालन येथ उघडले पाही.

हा वृक्ष नव्हे वट, पिंपळ वा प्राजक्त,
तगरीचे साधे फूल वाहिले फक्त

ही नव्हेच सरिता, सागर ? छे, ओहळ,
तळमळतो अंतरी शोधतो निर्मळ गंगाजळ.

मी वारस तुमच्या लोभाचा वडिलांनो,
मी याचक तुमच्या प्रेमाचा रसिकांनो.

हा स्विकार व्हावा करू नका अनमान,
द्या आशिष मजला उभवायास निशाण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ८६११० दि: ३/०५
क्रमांक २०६८ नोंद दि: ३०/३/०५
REFBK-0015554
REFBK-0015554

